# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women In Distress Situation**

**Police Station** :- **Shirpur**

**Date of Good Work done** :- **22/02/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे.शिरपूर येथे दाखल बलात्काराच्या गुन्हयातील आरोपीस 10 वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा झाली असून महिला विरुद्ध गुन्हयामध्ये आरोपीला कडक व जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी वाशिम पोलिस दल सतत प्रयत्नशील आहे.

## बलात्काराच्या आरोपीस १० वर्ष सश्रम कारावास

- ६ हजाराचा ठोठावला दंड
- अल्पवयीन मुलीस पळवुन नेवून केला होता बलात्कार

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ एका अल्पवयीन मुलीने व तिच्या कुटुंबीयांनी लग्नास नकार दिला होता. तरी देखील पांगरी नवघरे येथील अश्विन यादव वानखेडे याने सदर अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन, तिच्यावर बलात्कार केला होता . या प्रकरणी विषेश न्यायालयाने आरोपी अश्विन वानखेडे यास १० वर्ष सश्रम कारावास व ६ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

पोलीस स्टेशन शिरपुर येथे ६ मे २०१७ रोजी एका फिर्यादीने फिर्याद दिली होती की, त्या पांगरी नवघरे येथे लग्नाला गेल्या होत्या तेव्हा आरोपी नामे अश्विन यादव वानखेडे वय १९ वर्ष रा.पांगरी नवघरे यास त्यांची मुलगी पसंत पडली होती. त्यामुळे त्याने पिडीतास लग्नाची मागणी घातली होती. परंतु पिडीत मुलगी ही अल्पवयीनअसल्यामुळे फिर्यादीने मुलीच्या लग्नाला नकार दिला होता. त्याचा मनात राग धरून आरोपीने फिर्या–दीच्या मुलीस जबरदस्ती गाडीवर बसुन पळवून नेले होते. अशा रिपोर्ट वरुन आरोपी नामे अश्विन यादव वानखेडे विरुद्ध अपराध क्रंमाक ९१/२०१७ कलम ३६३,३६६(अ) भा.द.वि. गुन्हा नोंद करण्यात आलहोता.

सदर गुन्ह्याच्या तपास पोउपनि.गणेश मुपडे पो.स्टे.शिरपुर यांचे कडे सोपविण्यात आला होता. पोउपनि.मुपडे यांनी योग्य तपास करून आरोपी व पिडीतेचा शोध घेतला होता. व आरोपीस अटककेली होती.

तसेच पिडीतेच्या जबाबवरून सदर गुन्ह्यात कलम ३७६ (२) (ग्) भां.द.वी सह कलम ४ बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम असे कलम वाढ करण्यात आली होती. पोउपनि.गणेश मुपडे यांनी योग्य रित्या तपास करून आरोपी विरुद्ध विषेश न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

विषेश न्यायालयाच्या न्यायाधिश डॉ.रचना आर.तेहरा यांच्या समक्ष सदर प्रकरण चालविले असून १८ फेब्रुवारी रोजी न्यायाधिश रचना आर.तेहरा यांनी दोन्ही पक्षाची बाजु ऐकुन घेवुन आरोपी हा सदर गुन्ह्यात दोषी आढळुन आल्याने आरोपी नामे अश्विन यादव वानखेडे वय १९ वर्ष रा.पांगरी नवघरे ता.मालेगांव जि.वाशिम यास १० वर्ष सश्रम कारावास व ६ हजार दंडाची शिक्षा सुनावली आहे.

**दोन गुन्ह्यात दोन आरोपींना शिक्षा**

पोलीस अधिक्षक बच्चन सिंह ,अप्पर पोलीस अधिक्षक गोरख भामरे,उपविभागिय पोलीस अधिकारी सुनिलकुमार पुजारी,पोलीस निरिक्षक सुनिल वानखडे यांच्या मार्गदर्शनात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन नापोकॉ.भिमराव गवई ब.नं.१०६७ , मपोकाँ.ममता इंगोले यांनी कामकाज पाहीले.मागिल दोन महिण्यात २ गंभिर गुन्हात आरोपीला शिक्षा झाल्या आहेत.

आरोपीला शिक्षा झाल्याने पिडीतेस न्याय मिळाला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सहायक सरकारी अभियोक्ता अँड.सुचिता कुलकर्णी यांनी कामकाज पाहीले. (जि.प्र.)